विवाह पद्धतीत शिरलेल्या हुंडा, जेवणावळी, रुखवत, वराती इत्यादींसारख्या अनिष्ठ रुढी, परंपरांचे उच्चाटन करण्यासाठी समाजप्रबोधन करण्याचे व्रत आपल्या मंडळाने हाती घेतले आहे. आयुष्यभर कष्ट करुन कमावलेले धन अयोग्य पद्धतीने वापरुन, प्रसंगी ऋण काढून, आपले समाजबांधव विवाहसोहळ्यावर प्रचंड खर्च करीत असतात. या प्रथांना आळा घालणे शक्य व्हावे म्हणून मंडळाने सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. समाजातील विवाह ठरलेल्या किमान पाच वधू–वर जोडप्यांनी आपला मनोदय लेखी स्वरुपात कळविल्यास मंडळातर्फे त्यांच्या सामुदायिक विवाहांचे आयोजन करण्यात येईल. त्यासाठी येणारा खर्च भ्रातृमंडळ, पुणे तर्फे करण्यात येईल. तरी इच्छुकांनी २८ फेब्रुवारी २०२३ पर्यंत आपला मनोदय कळविल्यास एप्रिल / मे २०२३ मध्ये हा कार्यक्रम आयोजित करता येईल. यासाठी समाजबांधवांकडून यथायोग्य प्रतिसादाची अपेक्षा आहे.

**९) पती–पत्नी मधील मतभेद व त्यातून उद्‌भवणाऱ्या समस्या :**

वैवाहिक जीवन हा प्रत्येकाच्या आयुष्यात येणारा सुखानुभव आहे. परस्पर सामंजस्य आणि निरपेक्ष प्रेम हा त्याचा आधार आहे.

दुर्दैवाने काही वेळा या आधारास धक्का पोहोचतो. यःकश्चित कारणावरुन पती-पत्नीमध्ये वाद होऊन दुरावा निर्माण होतो व प्रकरण न्यायालयापर्यंत जाऊन पोहोचते. मूल असल्यास समस्या अधिकच जटील बनते. वाढत्या शिक्षण व समृद्धी बरोबरच या प्रकरणांची वाढत जाणारी संख्या ही खरोखरच चिंतेची बाब आहे. वर्षानुवर्षे रखडणाऱ्या न्याय प्रविष्ठ प्रकरणांची स्वतः पती-पत्नी व त्यांच्या कुटुंबियांना जबर किंमत मोजावी लागते. समाजातील विविध समस्यांना सन्मान्य तोडगा उपलब्ध करुन देण्यासाठी भ्रातृमंडळ, पुणे कटीबद्ध आहे. त्याचाच एक भाग म्हणून एकमेकांपासून दुरावलेल्या पती-पत्नीने आपले गाऱ्हाणे मंडळाकडे योग्य पद्धतीने मांडल्यास समस्येचे निराकरण करण्यासाठी सन्मान्य तडजोडीसाठी एक सामाजिक गरज म्हणून मंडळाकडून जाणिवपूर्वक प्रयत्न केले जातील.

**१०) स्वयं रोजगार मार्गदर्शन सेवा :**

आपल्या समाजातील वाढती शैक्षणिक जागृति व नोकऱ्यांची घटती उपलब्धता यामुळे सुशिक्षित तरुणांपुढे बेरोजगारीचे संकट कोसळले आहे. वर्षानुवर्षे त्यांना रोजगारासाठी वणवण फिरावे लागत आहे. अशा परिस्थितीत स्वयंरोजगाराचा एक चांगला पर्याय त्यांनी निवडल्यास, आपल्या मंडळाने सामाजिक बांधिलकीचा एक भाग म्हणून या तरुणांसाठी स्वयं रोजगाराबाबत योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. या तरुणांना स्वयं रोजगाराच्या संधी, उपलब्ध बाजारपेठ, लागणारे अर्थसहाय्य, प्रकल्प अहवाल इत्यादि अनेक विषयांवर आपल्या समाजातील उच्च पदस्थ अधिकारी, यशस्वी उद्योजक, यशस्वी व्यावसायिक मार्गदर्शन करतील. या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या समाजबांधवांनी कृपया संपर्क साधावा.

**११) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :**

यु. पी. एस. सी., एम. पी.एस.सी. वा तत्सम स्पर्धा परीक्षा शासनातर्फे दरवर्षी घेतल्या जातात. या परीक्षा पास होऊन अधिकारी पदांवर निवड झालेल्या आपल्या समाजातील विद्यार्थ्यांची संख्या अगदी नगण्य आहे. याचा अर्थ आपले विद्यार्थी हुशार नाहीत असे मुळीच नाही. आपल्या समाजात हुशार व मेहनती विद्यार्थी पुष्कळ आहेत; परंतु फारच थोड्या विद्यार्थ्यांना या परीक्षांविषयी माहिती असते. माहिती असणाऱ्यांपैकी फारच थोडे जण या परीक्षांना बसतात. मी आय.ए.एस. ची तयारी करतोय असे सांगणारा विद्यार्थी आपल्याला क्वचितच भेटेल. ही परिस्थिती बदलावी, जास्तीत जास्त पदवीधर विद्यार्थ्यांनी या परीक्षांना बसावे, त्यांना तयारीसाठी आवश्यक ते साहित्य व मार्गदर्शन उपलब्ध करावे, या उद्देशाने आपल्या मंडळाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु केले आहे. आपल्या वसतिगृहातील बरेचसे विद्यार्थी या परीक्षेची तयारी करीत आहेत. आपले विद्यार्थी या परीक्षांमध्ये यशस्वी होण्यास निश्चितच पात्र आहेत. गरज आहे ती त्यांना हुरुप व योग्य मार्गदर्शन देण्याची. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून उच्च पदावर पोहोचलेल्या अधिकाऱ्यांचे, प्राध्यापकांचे मार्गदर्शन या केंद्रातर्फे उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल. या केंद्रातर्फे मार्गदर्शनावबरोबरच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक ती पुस्तके उपलब्ध करुन देण्याचाही प्रयत्न केला जाईल.

समाजबांधवांनी आपल्या पाल्याला या स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी उत्तेजन द्यावे व मार्गदर्शन केंद्राचा जरुर लाभ घ्यावा.

**१२) रक्तगट सूची :**

सभासदांची रक्तगट सूची भ्रातृमंडळाच्या कार्यालयात उपलब्ध आहे. ही सूची परिपूर्ण करण्यासाठी सर्व समाजबांधवांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी आपला रक्तगट, संपूर्ण नांव, जन्मतारीख, पत्ता व फोन इत्यादी सविस्तर माहिती मंडळाच्या कार्यालयात कळवावी.

**१३) रक्तदान शिबीर :**

आपल्या लेवापाटीदार परिवाराचे भूषण, अखंड भारताचे शिल्पकार, लोह पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती दरवर्षी दि. ३१ ऑक्टोबर रोजी आपण साजरी करतो, त्यानिमित्त रविवार दि. २९ ऑक्टोबर, २०२३ रोजी मंडळाच्या जे. आर. पटेल विद्यार्थी वसतिगृहात सकाळी ९ वाजता रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सरदार वल्लभभाईच्या जयंतीनिमित्त रक्तदान करणे यासारखी त्यांच्या स्मृतीस आणखी कोणती भाववंदना असू शकेल? मानव सेवा हीच खरी ईश्वरसेवा! आपले रक्तदान हे दुसऱ्यासाठी जीवनदान ठरु शकते. या शिबिरातील आपला सहभाग सुनिश्चित करण्यासाठी मंडळाच्या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधावा.

**१४) योग व संस्कार शिबीर :**

आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुसंस्कृत व सुजाण नागरिक व्हावेत या उद्देशाने भ्रातृमंडळ, पुणे दरवर्षी जे. आर. पटेल विद्यार्थी वसतिगृहाच्या प्रांगणात योगाभ्यास व संस्कार शिबिराचे आयोजन करीत असते. या शिबिरात योगाभ्यास, प्राणायाम, व्यक्तिमत्त्व विकास आहार, आरोग्य, स्ट्रेस मॅनेजमेंट, टाईम मॅनेजमेंट इत्यादी विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाते. वसतिगृहातील विद्यार्थ्यांबरोबरच मंडळाचे सभासद अथवा त्यांचे पाल्यही या शिबिरास उपस्थित राहू शकतात.

**१५) भ्रातृमंडळ, पुणे – सौ. सरोज रविंद्र चौधरी विद्यार्थी सहाय्य योजना :**

समाजातील गरजू होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी हातभार लावण्याच्या उद्देशाने आपल्या मंडळाची ही अभिनव योजना गेल्या. एकविस वर्षापासून यशस्वीरित्या कार्यरत आहे. आजपर्यंत वेगवेगळ्या शैक्षणिक क्षेत्रातील ५३ विद्यार्थ्यांना आपण मदत देत आहोत. सर्व विद्यार्थी विशेष प्राविण्यासह यश प्राप्त करीत आपले ध्येय गाठण्याच्या दिशेने यशस्वी वाटचाल करीत आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ व्हावा या उद्देशाने आपल्या मंडळाने एक कोटी रुपये निधी संकलनाचा संकल्प केला आहे. या कायमस्वरुपी ठेवीच्या माध्यमातून येणाऱ्या व्याजाच्या रकमेतून विद्यार्थ्यांना आपणास आर्थिक सहाय्य देता येईल.

या निधीमध्ये आजतागायत मुदत ठेवी रुपये १३,३०,९९४/– जमा झालेले आहेत. दरवर्षी मिळालेल्या मदतीचा उल्लेख या अंकातील सुरुवातीला दिलेल्या सन्माननीय देणगीदारांच्या यादीत असतोच.

**१६) पद्मश्री डॉ. वि. भि. कोलते उर्फ भाऊसाहेब कोलते साहित्य पुरस्कार :**

आदरणीय सौ. विमल खाचणे आणि कै. मधुसुदन खाचणे पुरस्कृत पारितोषिक गेल्या आठ वर्षापासून सुरु केले आहे. पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे. पुरस्कार रक्कम रु. ५०१/–. सदर पुरस्कारासाठी समस्त समाज बंधू-भगिनींनी आपले समाज प्रबोधनात्मक साहित्य दि. ३० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत भ्रातृमंडळ, पुणे कार्यालयात पाठवावे. बक्षिसाचे वितरण २६ जानेवारी २०२४ च्या कार्यक्रमात करण्यात येईल.

**१७) बहिणाबाई चौधरी काव्यरत्न पुरस्कार :**

भ्रातृमंडळ, पुणे पुरस्कृत ज्येष्ठ कवयित्री बहिणाबाई चौधरी काव्यरत्न पुरस्कार गेल्या नऊ वर्षापासून देण्यात येत आहे. पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

**प्रथम पुरस्कार रु. ३,०००/–, द्वितीय पुरस्कार रु. २,०००/–, तृतीय पुरस्कार रु. १,०००/–**

सदर पुरस्कारासाठी सर्व समाज बंधू भगिनींना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपले समाज प्रबोधनात्मक काव्य भ्रातृमंडळ, पुणे कडे ३० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात पाठवावे. बक्षिसाचे वितरण २६ जानेवारी २०२४ च्या कार्यक्रमात करण्यात येईल.

**१८) भ्रातृमंडळ, पुणे पुरस्कृत कै. अजित वामनराव चौधरी स्मृती निबंध स्पर्धा :**

कै. अजित वामनराव चौधरी या समाजसेवी, सर्वप्रिय असलेल्या धडाडीच्या कार्यकर्त्याचे दि. २६ जुलै २०१० रोजी मानस सरोवर परिक्रमेदरम्यान दुःखद निधन झाले. त्यांना भ्रातृमंडळ व समस्त समाज बांधवांतर्फे श्रद्धांजली म्हणून त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सन २०१० पासून दरवर्षी भ्रातृमंडळ, पुणे तर्फे निबंध स्पर्धा आयोजित केली जाते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**वयोगट ६ ते १२ वर्षे** – शाळेचे ग्रंथालय

**वयोगट १२ ते १८ वर्षे** – नववर्षाचे संकल्प

**वयोगट १८ वर्षांपुढील** – भारताचा सांस्कृतिक वारसा

प्रत्येक गटासाठी खालीलप्रमाणे पुरस्कार ठेवण्यात आले आहेत.

**प्रथम पुरस्कार रु. २,०००/–, द्वितीय पुरस्कार रु. १,२५०/– तृतीय पुरस्कार रु. ७५०/–**

ही स्पर्धा समाजातील प्राथमिक शाळेपासून उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. संबंधित विषयावरील आपले अर्थपूर्ण निबंध भ्रातृमंडळ, पुणे कार्यालयात ३० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत पाठवावे. भ्रातृमंडळाच्या निवड समितीद्वारे सर्व निबंधांची गुणवत्तेनुसार छाननी करुन प्रथम तीन क्रमांक निवडण्यात येतील व त्यानुसार दरवर्षी २६ जानेवारी च्या कार्यक्रमात पुरस्कार दिले जातील.

**१९) सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहभोजन :**

दि. २६ जानेवारी, २०२४, शुक्रवार, सकाळी १० वा.

स्थळ : भ्रातृमंडळ, पुणे – जे. आर. पटेल विद्यार्थी वसतिगृह, वारजे जुना जकात नाक्यामागे, वारजे, पुणे – ५८.

आपल्या समाजातील यशस्वी उद्योजक, यशोगाथेचे मानकरी, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ समाजबांधव, रु. २०,०००/– च्या वर देणगी देणारे देणगीदार, सेवानिवृत्त समाजबांधव तसेच भ्रातृमंडळ, पुणे व दानशूर समाजबांधव यांनी पुरस्कृत केलेल्या विविध पारितोषिकांचे मानकरी या सर्वांचा यथोचित गौरव करण्यासाठी हा समारंभ आयोजिलेला आहे. त्यासाठी खालील स्वरुपाची माहिती सर्व संबंधितांनी दि. ३० नोव्हेंबर, २०२३ पूर्वी मंडळाकडे पाठवावे. उपलब्ध झालेल्या माहितीनुसार गौरवशाली समाजबांधवांचा यथोचित गौरव करण्यात येईल.

अ) वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेले ज्येष्ठ समाजबांधव (सभासद अथवा त्यांचे कुटुंबिय) यांची नावे, जन्मतारीख, वय आणि नोकरी/ व्यवसायाबद्दलची माहिती मंडळाकडे कळवावी.

ब) वर्षभरातील सेवानिवृत्त झालेले समाजबांधव.

क) हुंडा न घेतलेले नवविवाहित.

ड) यशस्वी उद्योजक, व्यावसायिक, तसेच विविध क्षेत्रात (सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इ.) विशेष उल्लेखनीय यश संपादन केलेल्या व्यक्तींनी आपली फोटोसहित सविस्तर माहिती पाठवावी.

इ) गुणवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करुन यशस्वी झालेल्या व्यक्तींसाठी भ्रातृमंडळ, पुणे व दानशूर

समाजबांधव यांनी पुरस्कृत केलेल्या पारितोषिकांबद्दलची सविस्तर माहिती याच अंकात इतरत्र दिली आहे. या माहितीस अनुसरुन पारितोषिकास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिकेची/प्रमाणपत्राची सत्य प्रत; तसेच पारितोषिकास पात्र असलेल्या समाजबांधवांनी आपल्या उल्लेखनीय कार्याविषयी/ यशाबद्दलची संक्षिप्त माहिती मंडळाकडे पाठवावी.

या कार्यक्रमात सुरुवातीला 'वर्षारंभ २०२४' चे प्रकाशन होईल. या छोट्याशा कार्यक्रमानंतर सांस्कृतिक कार्यक्रम होतील व त्यानंतर उपस्थित समाजबांधव स्नेहभोजनाचा आस्वाद घेतील. आपल्या कुटुंबात किती व्यक्ती स्नेहभोजनास येणार आहेत, हे मंडळाच्या कार्यालयास पत्राने अथवा दूरध्वनीवरुन कळविल्यास कार्यक्रमाचे नियोजन करणे सुकर होईल. सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या समाज बांधवांनी व त्यांच्या पाल्यांनी आपली नावे व कार्यक्रमाचे स्वरूप याविषयी मंडळाकडे दि. ३० नोव्हेंबर, २०२३ पूर्वी कळवावे. मंडळाने आयोजित केलेल्या या विशेष कार्यक्रमास सर्व समाजबांधवांना अगत्याचे निमंत्रण आहे.

**२०) सांस्कृतिक कलामंच :**

मंडळाच्या सांस्कृतिक कलामंच अंतर्गत चित्रकला, गीतगायन, रांगोळी, नृत्य, पुष्परचना, पाककला अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्याचे योजिले आहे. कृपया उत्सुक स्पर्धकांनी मंडळाशी संपर्क साधावा.

**२१) खाद्य मेळावा :**

खान्देश खाद्य मेळावा डिसेंबर २०२३ मध्ये घेण्यात येईल.

**२२) प्रतिक्रिया :**

आपल्या मंडळाचा स्नेह मेळावा, गौरव समारंभ, वधू-वर परिचय मेळावा सारखे कार्यक्रम, वधू-वर सूची यासारखे उपक्रम विविध समाजोपयोगी योजना, वर्षारंभ, या सर्वांमध्ये आपणास काही बदल, सुधारणा सुचवावयाच्या असल्यास, काही नवीन संकल्पना मांडावयाच्या असल्यास तसे मंडळास लेखी स्वरुपात कळवावे. मंडळाच्या कार्याविषयी आपले मत, सूचना, आक्षेप, अपेक्षा, अतिशय मोकळ्या मनाने कळवावी. 'मला असे वाटते' या शिर्षकाची आपल्याकडून शेकडो पत्रे अपेक्षित आहेत. आपल्या अभिप्रायाची जरुर दखल घेतली जाईल व वस्तुनिष्ठ आणि योग्य वाटलेले मुद्दे अंमलात आणले जातील. मंडळाचे कार्य अधिकाधिक समाजाभिमुख होऊन, त्यात गुणात्मक वाढ होण्यासाठी आपल्या सक्रीय सहभागाची अपेक्षा आहे.

मंडळाच्या कार्यकारिणीची बैठक प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी दुपारी ४.०० वा. मंडळाच्या कार्यालयात वारजे येथे होत असते. कार्यकारिणी सदस्य तसेच सभासदांपैकी कोणीही या बैठकीस हजर राहून मंडळाच्या कामकाजात सहभागी होऊन विधायक सूचना करु शकतात. त्यांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार करण्यात येतो.




आल्हाददायक व सुखकर प्रवासासाठी एकच नाव

श्री स्वामीनारायण ट्रॅव्हल्स

**श्री. प्रमोद वासुदेव झांबरे, बामणोद, श्री. तुषार वासुदेव झांबरे, बामणोद,**

**श्री. पोपट केवजी चौधरी, भालोद, श्री. चंद्रशेखर भास्कर पाटील, खिर्डी**

हे दरवर्षी वधू-वर मेळाव्याची माहिती पत्रके, फॉर्म, सूची नेणे व आणणे ही सेवा मोफत पुरवतात

भ्रातृ मंडळ, पुणे त्यांचे सदैव ऋणी आहे.



# भ्रातृमंडळ, पुणे
# जे.आर. पटेल विद्यार्थी वसतीगृह

**श्री. सचिंद्र नेमाडे, सदस्य, वसतिगृह व्यवस्थापन समिती**

पुण्यात आपल्या लेवा–पाटीदार समाजाचे स्वतःचे असे वेगळे अस्तित्त्व निर्माण करण्यात यशस्वी झालेली 'भ्रातृमंडळ, पुणे' ही समाजसेवी संस्था आणि समाजकार्यास वाहून घेतलेले समाजबांधव यांच्या सामुहिक व अथक प्रयत्नांतून उभे राहिलेले असे 'जे. आर. पटेल वसतिगृह' या वसतीगृहाला खरोखरच आज समाजसंस्कार मंदिर म्हणूनच संबोधायला हवे, कारण समाजास संघटीत करुन सेवाभाव, परस्पर जिव्हाळा, स्वावलंबन, काटकसर व निर्व्यसनीपणा इत्यादी गुणांचे संस्कार वसतीगृहात मिळतात. हे संस्कार आपल्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष आचरणात येत असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या प्रगतीतून दिसत आहे. विद्यार्थ्यांची आपलेपणाची भावना या मंदिराचे आणखीनच पावित्र्य वाढवित आहेत. प्रत्येकाचे जीवन त्याच्या सामर्थ्यात, कर्तृत्वात, बुद्धि कौशल्यात दडलेले असते. प्रत्येकात सुप्त गुण असतात, फक्त त्यांना योग्य दिशेने प्रवाहित केले पाहिजे हेच दिशादर्शनाचे फक्त प्रशंसनीयच नव्हे तर पूजनीय कार्य या वसतीगृहात होत आहे. येथे विद्यार्थी घडत आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनाला आकार देणाऱ्या गोष्टी म्हणजेच आत्मविश्वास, चिकाटी, ध्येय व प्रयत्नांवर निष्ठा, या सर्वांना वृद्धिंगत होण्यासाठी मंडळाची सतत धडपड सुरु असते.

वारज्याच्या टेकडीवर वसलेले आपले हे वसतीगृह म्हणजे विद्यार्थ्यांसाठी एक स्वर्गच आहे. प्रदुषणाने ग्रासलेल्या शहराच्या मध्यभागापासून दूर आणि प्रशस्त व मोकळ्या हवेत सर्व सोयी सुविधांनी युक्त असे आपले वसतीगृह म्हणजे विद्यार्थ्यांसाठी एक नंदनवनच आहे.

आर्थिक बिकट परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील अनेक हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळू शकत नाही. केवळ राहण्याच्या अडचणीमुळे खेड्यापाड्यातील आपल्या समाजातील बुद्धीमान मुले शिक्षणासाठी शहराकडे वळत नाहीत. पर्यायाने शिक्षणापासून वंचित राहतात, आणि पुणे हे तर विद्येचे माहेरघर. त्यामुळे पुण्यात असे वसतीगृह उभारून भ्रातृमंडळ, पुणे या संस्थेनी या विद्यार्थ्यांसाठी पुढील शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. विद्यार्थी हा समाजाचा व राष्ट्राचा पाया आहे आणि या पायाचा संपूर्ण विकास झाला पाहिजे, या भावनेतून विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय, अभ्यासासाठी सुसज्ज ग्रंथालय, स्वच्छता व अभ्यासासाठी पोषक वातावरण तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक उपक्रम वसतीगृहामार्फत राबविले जातात.

वसतीगृहात वेगवेगळ्या संस्कार शिबिरांचे आयोजन सुद्धा केले जाते. यात प्रामुख्याने योगासने, प्राणायाम, Stress Management, Personality Development, Time Management, Goal - setting, Meditation, Diet या संदर्भात सखोल ज्ञान दिले जाते. वसतीगृहातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षांची तयारी करता यावी म्हणून वाचनालयात विविध पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच वर्तमानपत्रे ही उपलब्ध असतात. स्पर्धा परिक्षांकरिता बऱ्याच मान्यवर पाहुण्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळत असते. याकरीता आपल्या मंडळाने 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र' सुरु केले आहे.

आपल्या वसतिगृहाचा मागील २५ वर्षांमध्ये साधारणतः २,३०० विद्यार्थ्यांनी फायदा घेतलेला आहे. त्यात विविध शाखांमधील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. १२ वी, इंजिनिअरींग, बी. फार्म, एम. फार्म, एम.सी.ए., एम. बी.ए., एम.एस.सी., एल. एल. बी., एम. ई., संगणक क्लासेस इत्यादी अभ्यासक्रमाला असलेले विद्यार्थी येथे अगदी एकमेकांच्या सहकार्याने मंडळाच्या ज्येष्ठ मंडळीकडून मार्गदर्शन घेत आहेत.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे दान कुठलेही असले तरी ते परमेश्वराचे आशिर्वाद व छत्र मिळण्याचे साधन आहे आणि त्यातल्या त्यात रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. अभिमानाने सांगावेसे वाटते की आपल्या या वसतीगृहातील विद्यार्थी प्रत्येक वर्षी रक्तदान शिबीराच्या आयोजनात मोठ्या संख्येने भाग घेत असतात. हे विद्यार्थी केव्हाही कुणालाही रक्त देण्यासाठी सतत तयार असतात. दैनंदिन जीवनापेक्षा थोडेसे वेगळे अनुभवायला मिळावे, मुलांनी जास्तीत जास्त एकोप्याने रहावे यासाठी भ्रातृमंडळ आपल्या वसतीगृहातील मुलांना विविध प्रकारचे कार्यक्रम घेण्यासाठी उत्तेजन देत असते. यामध्ये गणेशोत्सव, कोजागिरी पौर्णिमा या कार्यक्रमांचा समावेश असतो.

'भ्रातृमंडळ' दरवर्षी १५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण देशभक्ती व देशप्रेमाने भरलेल्या सद्भावनेत वसतीगृहात साजरे करते. १५ ऑगस्ट हा आपला गुणगौरव समारंभ असतो व २६ जानेवारीला मंडळाची वार्षिक सभा, सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहभोजनाचा

कार्यक्रम असतो. अशा प्रत्येक वेळी मंडळाचे मान्यवर हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतात. या कार्यक्रमांमध्ये वसतीगृहातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

या वर्षी आपल्या वसतीगृहाचे नवीन रंगकाम आपण केले. खोल्यांमध्ये सर्व सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे. आपल्या वसतीगृहात गरम पाण्याच्या सोयीसाठी २,००० लिटर क्षमतेची सोलर सिस्टीम बसविण्यात आलेली आहे. यामुळे मुलांना प्रत्येक मजल्यावर गरम पाणी उपलब्ध होऊ शकते. विद्यार्थ्यांच्या टू व्हिलरस् ठेवण्यासाठी एका छान पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मुलांना इंटरनेटच्या वापराची सुविधा देण्यात आलेली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी अॅक्वा-गार्ड बसवलेले आहे. वसतिगृहाच्या देखरेखेसाठी २४ तास वॉचमन आपण उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच आठ सी. सी. टी. व्ही. कॅमेरे पण लावलेले आहेत. या सर्व कार्यात आपल्या मंडळाचे व्यवस्थापक श्री. दत्ता पाटील हे मोलाची कामगिरी बजावीत आहेत. यासाठी आपल्या वसतीगृहाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य सतत मार्गदर्शन करीत असतात.

वसतिगृहाच्या संपूर्ण कार्यात भ्रातृमंडळाचे कार्यकारी मंडळाचे सदस्य व इतर समाजबांधव या सर्वांचा पूर्ण सहभाग असतो. याचा आपले विद्यार्थी पूर्णपणे उपभोग घेत आहेत. नवनवीन विद्यार्थी येथे येऊन घडत आहेत, हे पाहून मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्याची पावती मिळाल्याचे समाधान वाटत असते.

मी आपल्या सर्व समाजबांधवांना विनंती करतो की, या समाजसंस्कार मंदिररुपी वसतीगृहाची माहिती आपल्या गावाकडून येऊ इच्छिणाऱ्या सर्व गरजू विद्यार्थ्यांना द्यावी जेणेकरुन या वसतीगृहात येऊन ते विद्यार्थी स्वतःच्या सर्वांगीण विकासाबरोबरच समाजशिक्षण देखील येथे मिळवू शकतील.

---

# लेवा सखी मंडळाचे उपक्रम

**सौ. स्नेहल महाजन**



लेवा सखी मंडळाच्या स्थापनेला आता १० वर्षे पूर्ण झालीत. या मंडळातर्फे आजपर्यंत अनेक विविध गुणदर्शन कार्यक्रम आयोजित केलेत. हे सर्व कार्यक्रम आपल्या सर्व सख्यांच्या कलागुणांना वाव देणारे तसेच त्या करीत असलेल्या व्यवसायाची जाहिरात करून त्यांना घरबसल्या उत्पन्न मिळवून देणारे असतात. या धकाधकीच्या जीवनात सर्व ताणतणाव विसरुन त्यांना विरंगुळा देणाऱ्या व मनोरंजन करणाऱ्या कार्यक्रमांचाही यांत समावेश असतो.

या कार्यक्रमांना मिळणारा प्रतिसाद अजूनही वाढावा तसेच हे कार्यक्रम जास्तीत जास्त यशस्वी व्हावेत यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. फक्त सभासद संख्या वाढवणे हे या मंडळाचे ध्येय नसून जास्तीत जास्त सख्यांचा प्रत्यक्ष सहभाग अपेक्षित आहे. आताच्या घडीला सखी मंडळाचे ३६० सभासद आहेत.

आजपर्यंत या मंडळाने विविध कार्यक्रम पार पाडले. उदा. तिळगूळ समारंभ, खाद्यमेळावा, वर्षासहल, दांडिया, वाळवण मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध विषयांवरील व्याख्याने वगैरे.

परंतु या २ वर्षांत कोरोना परिस्थितीमुळे सखी मंडळाचे कार्यक्रमही झाले नाहीत. या वर्षी तर फक्त वर्षा सहल आयोजित करण्यात आली होती. तिचा तपशील खालीलप्रमाणे -

२०२१-२२ या वर्षाची वर्षासहल ७ ऑगस्ट २०२२ रोजी Mayome Resorts, भोर येथे गेली होती. त्यात ३२ सख्यांनी सहभाग घेतला होता. तिथले निसर्ग सौंदर्य अप्रतिम होते. काही सख्यांनी treking चा आनंद लुटला व जवळच असलेल्या भामा नदीच्या काठावर बसून धमाल केली.

सख्यांचे विविध खेळ घेतले व विजेत्यांना बक्षीसे दिली. तसेच ४ लकी ड्रॉ विनर काढून त्यांनाही बक्षिसे देण्यात आली. सौ. प्रतिभा राणे यांनी काही विषयांवर सख्यांना मार्गदर्शन केले. तसेच रोजच्या जीवनातील नेहमीच्या विषयांवर त्यांना बोलायला उद्युक्त केले व प्रत्येकीने त्यावर आपले मनोगत व्यक्त केले.

या वर्षासहलीसाठी भ्रातृमंडळाने देखील आर्थिक सहकार्य केले. आता लवकरच पुन्हा सखी मंडळाचे कार्यक्रम पूर्ववत सुरू होतील अशी आशा करते. तरी या पुढे होणाऱ्या सर्व कार्यक्रमांना सर्व संख्या भरघोस प्रतिसाद देतील ही अपेक्षा करते.

# बहिणाबाई चौधरी काव्य रत्न पुरस्कार - बारावे वर्ष

## प्रथम पुरस्कार रु. ३,०००/-
## निसर्ग

किती सुंदर हा निसर्ग,
किती महान हा निसर्ग
देवूया मान या निसर्गाला
करूया सलाम या निसर्गाला.
दिली फळे, फुले, झाडे या निसर्गाने
दिले थंडी, ऊन, पाऊस, हवा या निसर्गाने
निसर्गाचे या जतन करायला शिकूया
निसर्गाचा या जपून वापर करूया.
विविध रंग, गंध, ऋतु आणि
नाना कलांचा संगम या निसर्गात
विविध झाडे, झुडपे यापासून होतो शोध औषधांचा
हा चमत्कार या निसर्गात
निसर्गाचे या जतन करायला शिकूया
निसर्गाचा या जपून वापर करूया.
दिले प्रेम, शांती, सुख, दुःख या निसर्गाने
दिली निरागस छाया, आनंद, माया या निसर्गाने
निसर्गाचे या जतन करायला शिकूया
निसर्गाचा या जपून वापर करूया
नवनविन साक्षात्कार घडविणारा
एक श्रेष्ठतम असा हा कलावंत
म्हणजे निसर्ग !!!

**Mohini. D. Chaudhari**
8, Laxmijit Apt, 243/7,
Ekdant Vihar Lane, Aundh, Pune-07
**मो. ९३७२०१९७७०.**

## द्वितीय पुरस्कार रु. २,०००/-
## कांदेपोहे लग्नगाठींचे

लग्नाच्या गाठी म्हणे बांधल्या जातात स्वर्गात
होतात कार्यक्रम तरी छान कांद्या पोह्याचे जोरात
हळूच मुलगी बघते लाजत गालात छान हसत
मनात म्हणते पाहीन कमीजास्त पुढे जीवनात ।।१।।
वरुन गाठी पडल्या तरी पाहिले जातात गुण
दिली जातात आश्वासन काही खरी - खोटी
देणं घेणं काही नसतं मिळते मनःशांती
लग्न मात्र झोकात करा अट असते छोटी ।।२।।
मान्य असते घाईत तेव्हा गुढग्याला बाशिंग
डौलात, थाटात होतात सप्तपदीविधी सारे
रडारड पाठवणी संगीत व्हिडिओ यथोचित
विधीवत गृहप्रवेश आनंदात चैतन्याचे वारे ।।३।।
दोन्ही घरं जुळतात येतात जवळ विचार
शिकवणी चांगली वाईट सुरु होतात रागलोभ
भांड्याला भांड लागतं शकलं होतात दोन
भाबड्या मनांमध्ये होतो विनाकारण क्षोभ ।।४।।
नका पाहू फक्त स्पार्क पाहा गुणी वधूवर
आठवा बहिणाबाईंचा कष्टाचा सुखसागर
आदर करा मोठ्यांचा घाला स्वतःला आवर
जगणे व्हावे गाणे जपा वैविध्य जीवनभर ।।५।।
धन नसले तरी कर्तृत्व घडवी सोन्याचा उंबरा
तनमन अर्पून मुलमुली फुलवितात घर झुंबरा
उजळतात ज्योती स्नेहाच्या मोठ्यांच्या आदरा
मिळतो आशिर्वाद प्रेमाचा मुलगासूनेस साजरा ।।६।।
ध्येय उच्च ठेवा कष्टाशिवाय नाही संसार
म्हणूनच मुला-मुलींनो करा सारासार विचार
प्रेम, माया घडविते फुलविते जीवन मोहक सुंदर
निर्मळ, रेशमी जीवन गाठी बांधून, व्हा की हो कलंदर।।७।।
नांदा सौख्य भरे बाळगा ब्रिद स्वाभिमानाने
डाव मांडून मुलांनों - नका मोडू संसार
गाठा सुवर्णमध्य बाणवा बहिणाईंचे आचार
कांदेपोहे जुळवितात समन्वयाचे गोड विचार ।।८।।

**काव्यशब्द वेलफुले ,**
**मधुबाला शालिग्राम पाटील**
**विकास मंडळ सदस्या, मुलुंड**
**मुलुंड, मुंबई.**
**मो. ९८१९३८२३०१.**

# भ्रातृमंडळ, पुणे पुरस्कृत

# कै. अजित वामनराव चौधरी स्मृती निबंध स्पर्धा २०२२-२३


## सौ. छाया दिपक चौधरी, मो. ९३७२०१९७७०


## वयोगट - १८ वर्षापुढील

# कोरोनामुळे झालेले जागतिक बदल

**प्रथम क्रमांक – रु. २,०००/–**

जागतिक हवामान बदल आणि तापमानातील वाढ यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला मंदी जाणवू लागली होती. त्यातच कोरोना नामक विषाणूच्या उद्रेकामुळे जागतिक अर्थव्यवस्था कोलमडण्यास सुरुवात झाली. पैशांमागे धावणारे आम्ही, कुठेतरी माणसाला थांबावे लागते हे समजले. पैसा हे सर्वस्व नाही, हे कोरोना नामक परिस्थितीने दाखवून दिले. कोरोना या विषाणूवर जरी प्रतिजैविक आता उपलब्ध नसली तरी प्रतिबंधक औषधांमुळे कोरोना आता आटोक्यात आला आहे. तरी कोरोना या विषाणूच्या उद्रेकामुळे पूर्ण जगाने खूप काही बदल अनुभवले आहेत.

आधी आपण सकारात्मक बदल कोणते झाले ते पाहूया. कोरोनाचा एक सकारात्मक बदल म्हणजे कोरोनाने दिलेली निसर्गदृष्टी. कोरोनाच्या मुळे सुरू झालेला लॉकडाऊनमध्ये सर्वच जण धावपळीच्या जीवनापासून थोडे निवांत झाले. या निवांतपणामध्ये आजूबाजूच्या निसर्गाकडे सहजगतेने पाहण्याची दृष्टी मिळाली. मोबाईलच्या अलार्मने जागे होणारे, पक्ष्यांच्या आवाजांनी जागे होऊ लागले. आपल्या आजूबाजूला झाडे, पक्षी राहतात हे ठळक पणे जाणवले. प्रदूषण कमी झाल्यामुळे दूरवरचे डोंगर, झाडे आणि इतर नजारे दिसू लागले. नद्यांचे पाणी प्रदूषणविरहीत झाल्यामुळे नितळ दिसू लागले. स्वच्छ आकाश (flemingo) (फलेमिंगो) ने भरले. प्रदूषण कमी झाल्यामुळे शहरी भागातही रात्रीच्या आकाशात चमकणारे तारे स्पष्टपणे दृष्टीस पडले.

कोरोनाच्या संकटातही पर्यावरणस्नेहींना पर्यावरण संवर्धनाची संधी दिसली. प्रत्येकाला शुद्ध हवा, स्वच्छ पाणी याचे महत्त्व कळले होते. त्यासाठी प्रत्येकाने वैयक्तिक पातळीवर काही गोष्टी करायला हव्यात. मग यासाठी मदत घेतली गेली सोशल मिडियाची. सध्या सोशल मिडियावर आलेले चॅलेन्ज पूर्ण केले जातात. प्रत्येकाने एक झाड लावण्याचे (one tree challenge) आवाहन केले गेले आणि काय आश्चर्य भारताबरोबर इतर देशांमध्येही हे चॅलेन्ज उत्तमप्रकारे स्विकारले गेले. कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेऊन, ऑक्सिजनचा पुरवठा करणारे झाड नावाचे यंत्र आपल्याकडे आहे. त्यामुळे भविष्यकाळातील तापमान वाढ रोखण्यास मदत होईल.

कोरोनाने आपल्याला काही ठिकाणी बदलायला भाग पाडले. सण, समारंभ व उत्सव जे खूप धामधूमीने साजरे केले जात होते. त्यासाठी खूप पैसा, वेळ यांचा अपव्यय होत होता. कोरोनाच्या भीतीने हे सर्व कमी लोकांमध्ये साजरे होऊ लागले. कर्ज काढून सण, समारंभ साजरे करण्याची गरज पडली नाही. अत्यंत साधेपणाने सण–समारंभ साजरे केल्यामुळे हवेचे, पाण्याचे आणि आवाजाचे प्रदूषण कमी झाले. हजारोंच्या संख्येने साजरे केले जाणारे सार्वजनिक गणेशोत्सव, ताबुतांच्या मिरवणुका, दहीहंडी हे सण कोरोनाच्या भीतीने अत्यंत साधेपणाने साजरे करून जनतेने संयम दाखविला. सामाजिक अंतर पाळण्याच्या निमित्ताने / नियमाने लोकांमध्ये शिस्तपालन करण्याची सवय लागली.

लॉकडाऊन मध्ये 'वर्क फ्रॉम होम' या संकल्पनेचा वापर करून ऑफिसमधील कामे घरी बसून पूर्ण करण्यात आली. कोरोनानंतर ही या संकलानेचा वापर केल्यामुळे इंधन प्रदूषण आणि ट्रॅफीक जाम यासारख्या समस्यांवर पर्याय निघाला आहे. वर्क फ्रॉम होम यामुळे घरातील लोकांचे प्रेम आणि सहवास मिळाला. त्यामुळे एकमेकांना समजून घेणे सोपे झाले. आपल्या शेजारी गल्लीमध्ये कोण राहते हे

समजले. एकमेकांना मदत करू लागले. जातिभेद विसरून एकमेकांमधील संबंध दृढ होऊ लागले. कोरोनाने अहंकाराची पंखे छाटण्यास मदत केली. म्हणूनच की काय कोरोना पेशंटला जेव्हा रक्त, प्लाझमा अथवा ऑक्सिजनची गरज भासत होती तेव्हा कोणीही पुढे येऊन मदत करीत होते. कोठेही जातिभेद, वर्णभेद गरीब-श्रीमंत असा भेद दिसला नाही.

घरगुती सण-समारंभ योग्य पद्धतीने साजरे केल्यामुळे मुलांना आपल्या संस्कृतीची ओळख झाली. कालबाह्य होत असलेले बैठे खेळ एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला शिकविले गेले. प्रत्येकाला आपल्यामध्ये असलेली कला जोपासण्यास वेळ मिळाला. अनावश्यक खरेदीला आळा बसला. हॉटेलमध्ये मिळणारे पदार्थ घरीच बनविण्यास शिकले. लॉकडाऊनमध्ये बाहेर पडणे बंद होते, त्यामुळे आहे त्या साधन-सामग्रीवर जगता येते त्याची जाणीव झाली.

कोरोनामुळे झालेला अजून एक चांगला बदल म्हणजे सर्वांनी कोरोनाकाळात नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले. मोबाईल, संगणक, लॅपटॉप कसे वापरायचे हे शिकून घेतले. या तंत्रज्ञानाच्या मदतीने विदयार्थी आणि शिक्षक आपआपल्या घरी असून ऑनलाईन क्लासेस करू लागले. अशा प्रकारे कोणाच्याही शिक्षणामध्ये खंड पडला नाही. ऑनलाईन परिक्षा घेतल्या गेल्यामुळे कोणाचेही शिक्षण अपूर्ण राहिले नाही. सोशल मिडियामुळे पूर्ण एकमेकांच्या जवळ आले होते. कोरोनाला दूर कसे ठेवायचे, कोरोना झाला तर काय काळजी घ्यायची, आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम सोशल मिडियावर केले जात होते. वेगवेगळ्या ॲपसच्या मदतीने पेशंटला लागणारी औषधी, ऑक्सिजन, बेड इ. वस्तूंची माहिती मिळत होती. सोशल मिडियावरून केलेल्या आवाहनांना प्रतिसाद दिला जात होता. एकमेकांना मदत केली जात होती. जगातील कोणत्याही देशातील ज्ञान इंटरनेटच्या माध्यमातून distance learning च्या मदतीने कोणीही घेऊ शकत होते.

आपल्या देशातील शास्त्रज्ञांच्या अथक परिश्रमानंतर कमी वेळात कोरोना विषाणूवर लस शोधण्यात आली. त्यामुळे कोरोनाची भीती थोड्याफार प्रमाणात कमी झाली. आपल्या भारताने 'एक पृथ्वी एक आरोग्य' हा दृष्टिकोन ठेवत अनेक देशांना कोरोनावरील आवश्यक औषधी, कोरोनाची लस देऊन कोट्यावधी लोकांचे जीव वाचविले.

कोरोनाच्या या संकटकाळात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राने २४ तास काम करून सर्व देशांना एका खूप मोठ्या संकटातून वाचविले आहे. आज भारताकडे जगातील सर्वात मोठी सुरक्षित, यशस्वी डिजिटल पेमेंट व्यवस्था आहे. कोरोना संक्रमणाचा माग काढण्यासाठी आरोग्य सेतू ॲप, लसीकरणासाठी कोविन पोर्टल तयार करण्यात आले. या पोर्टलवर पूर्वनोंदणी करण्यापासून ते लसीकरण. प्रमाणपत्र मिळविण्याची जी ऑनलाईन व्यवस्था आहे, त्याकडे अनेक देश आकर्षित झाले आहे. या सर्व शोधांमुळे जगभरात आज भारत देशाची चांगली प्रतिमा तयार झाल आहे.

जगभरात लॉकडाऊन असल्यामुळे वस्तूंची आयात निर्यात बंद होती. अशावेळेस उदयोगधंदे आणि कंपनी बंद ठेवली असती तर आपली अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली असती हे लक्षात घेऊन आत्मनिर्भर भारत ही संकल्पना लक्षात ठेवून 'मेक इन इंडिया', 'मेक फॉर द वर्ल्ड' स्वनिर्मित संरक्षण क्षेपणास्त्र, सौर ऊर्जा निर्मितीसाठी लागणारी उत्पादने देशातच तयार करण्यास प्रोत्साहन दिले गेले. यासाठी लागणाऱ्या प्रक्रिया सोप्या करण्यावर भर दिला गेला. अनेक देशांनी पण प्रेरित होऊन या प्रकारे वाटचाल सुरू केली आहे.

कोरोनाच्या भीतीने स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे किती गरजेची आहे हे सर्वांच्या लक्षात आले. आरोग्य कसे टिकवायचे याबद्दल प्रत्येकामध्ये सजगता निर्माण झाली. आपल्याकडील प्राचीन योगा पद्धती आणि आयुर्वेद पद्धतीची ओळख आणि महत्त्व कोरोनामुळे सर्वच देशांमधील लोकांना कळली. सर्वांनी स्वतःला निरोगी ठेवण्यासाठी योगाभ्यास आणि आयुर्वेद या उपचार पद्धतींचा अवलंब केला. अशा प्रकारे आपली प्राचीन संस्कृती सर्वदूर पोहोचली. आत्मकेंद्री बनत चाललेल्या माणसाला कोरोनाने खूप मोठा धडा दिला.

कोरोनामुळे झालेला सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे चीनला शेजारील राष्ट्रांबरोबर संबंध सुधारण्याची सुबुद्धी सुचली आहे. चीनची

शेजारील राष्ट्रांची कुरापत काढण्याची वृत्ती, विस्तारवादाची इच्छा आणि एकाधिकारशाही यासाठी केले गेलेले डावपेच अयशस्वी होत आहे. त्यातच चीनमध्ये पुन्हा एकदा कोरोनाचा विस्फोट झाल्यामुळे चीनची अर्थव्यवस्था आणि जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. त्यामुळे चीनला शेजारील राष्ट्रांशी (दुश्मनी). शत्रुत्व परवडणार नाही. कोरोनामुळे चीनचे महासत्ता बनण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

कोरोनाचे जसे सकारात्मक बदल जगाने अनुभवले तसेच नकारात्मक बदलही अनुभवास आले. काही बदल अल्पकालीन तर काही दीर्घकालीन होते. कोरोनाचा जेव्हा सर्व जगात उद्रेक झाला त्यावेळेस सर्वच ठिकाणी आरोग्य यंत्रणेवर प्रचंड ताण आला होता. कोरोनाचे उपचार करणारे सरकारी रुग्णालये अत्यंत गंभीर समस्येला सामोरे जातांना दिसली. कोरोनाबाधित रुग्ण, त्यांचे नातेवाईक आणि त्याच्यावर उपचार करणार हे सगळेच मोठ्या मानसिक तणावातून गेले. काही या मानसिक तणावातून अजूनही बाहेर आलेले नाही. कोरोनाचा परिणाम म्हणून आरोग्य सेवा महाग झाल्या आहेत.

कोरोनामुळे जगावर जे आर्थिक संकट येऊन ठेपले आहे, त्याने बहुतांश लोकांच्या कमाईवर परिणाम झाला आहे. आज अनेकांचे उत्पन्न बंद झाले आहे. ज्यांच्या नोकऱ्या सुरू आहेत, त्यांना पुरेसा पगार वेळेवर मिळत नाही आहे. यामुळे जगात आर्थिक विषमता तर वाढली आहे. कोरोनामुळे अनेक देशांची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली आहे. विकासदरामध्ये सातत्याने घसरण होत आहे. हे असेच चालू राहिले तर जगभरात मंदीचे वातावरण येईन. या परिस्थितीमधून बाहेर येण्यासाठी काही देशांनी पॅकेज जाहिर केले आहे. जेणेकरून उद्योगधंदे यांना प्रोत्साहन मिळेल. काही देशांनी रिव्हर्स रेपो दर आणि रेपो दरात कपात केली आहे. जागतिक अर्थव्यवस्था पुन्हा केव्हा रूळावर येईल याचा अंदाज आत्ताच लावणं शक्य नसल्याचे बोलले जात आहे.

मोठे नुकसान झाल्यामुळे काही काळापुरते गुंतवणूकदारांच्या इच्छांना थोपवू शकतात. त्यामुळे मंदीचे वातावरण कायम राहण्याची शक्यता आहे. कोरोनाचे संकट अजून पूर्णपणे संपलेले नाही. संभाव्य वाढीच्या शक्यतेमुळे गुंतवणुकीच्या निर्णयामध्ये आत्मविश्वास नाही. मूलभूत पुरवठा आणि मागणीत काहीही बदल झालेले नाही. छोटे आणि कमकुवत उद्योग यांनी आर्थिक घडामोडींचा गाठलेला स्तर हा खूप खालच्या पातळीवरचा आहे. त्यामुळे अनुत्पादक कर्ज आकडेवारीत पुन्हा वाढ होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे बँकिंग क्षेत्रातील तरलता आणि पतपुरवठ्यावर विपरित परिणाम होत आहे.

अभ्यासकांच्या मते, पर्यावरणाचा ऱ्हास, त्यामुळे झालेली वातावरणातील तापमान वाढ ही या प्रकारच्या सूक्ष्मजीवांच्या वाढीस कारण आहे. आता तरी मानवाने सावधानतेने पर्यावरणात उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीचा वापर कमी प्रमाणात आणि योग्य प्रकारे करून भविष्यासाठी तरतूद केली पाहिजे म्हणजे यापुढे कोरोनासारख्या समस्येला तोंड दयावे लागणार नाही.

प्रत्येकाने पर्यावरणाचा समतोल राखण्याची शपथ स्वतःशी प्रामाणिकपणे घेतली पाहिजे.

---


**श्री. सचिन फेगडे,** मो.:९०९६८९३१७५, ८८८८०३११११६ ।।श्री।। **श्री. निलेश फेगडे,** मो.:९८५००१७२७२

# खान्देश फुड अँड ट्रेडिंग

**फुड प्रॉडक्टस् : विविध फ्लेवर्स**

बनाना रेग्युलर, बनाना सॉल्टेड, बनाना टोमॅटो, बनाना चाट मसाला, बनाना जिरा, बनाना काळी मिरी, बनाना चिवडा, व्हिट पफ, बनाना पुदीना, इत्यादी

**पुणे येथे मिळण्याचे ठिकाण: चितळे बंधू मिठाईवाले, अग्रज फूड प्रोसेसर व सर्वत्र**

**७२अ, चमेलीनगर, दत्तनगर, वांजोळा रोड, भुसावळ, जि. जळगांव**

E-mail: khandeshfood19@gmail.com

# विशेष उल्लेखनिय कामगिरी करणारे समाजबांधव

## १) डॉ. प्रियंका खर्चे



पीएचडी करणे हे अत्यंत आव्हानात्मक काम आहे. आपण हे बौद्धिक उत्तेजनासाठी करत असताना, कधीकधी आपल्याला प्रश्न पडतो: आपण स्वतःला अशा अडचणीत का टाकतो? तुम्ही हे का निवडले आहे याचे स्मरणपत्र हवे असल्यास, युनीक्लोचे संस्थापक, Tadashi Yanai यांचे एक कोट येथे आहे, जे मला उपयुक्त वाटले. ''मी कधीही कोणत्याही गोष्टीवर समाधानी नाही कारण जग सतत बदलत आहे. वर चढत राहिल्यास आणखी एक उंच पर्वत दिसतो. तुम्ही त्या शिखरावर चढून दुसरे शिखर पहा. मी शेवटी निघून जाईन कारण तेच जीवन आहे. पण मी पर्वत चढत आहे कारण मला पर्वत चढण्याच्या प्रक्रियेचा आनंद मिळतो.'' नुकत्याच ६ जानेवारीला पार पडलेल्या ३६ व्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा पदवी प्रदान समारंभात पीएचडी हि पदवी घेत डॉ. प्रियंका खर्चे धांडे हि कृषि विद्या विभागातून विद्यापीठात प्रथम आली आणि २ गोल्ड मेडलने सन्मानित झाली. पहिले युनिव्हर्सिटी गोल्ड मेडल आणि दुसरे डॉ. वसंतराव खुस्पे. जिद्द आणि चिकाटी असेल, तर कोणत्याही कामात अथवा क्षेत्रात यश मिळतेच. हे बुलढाणा जिल्ह्यातील पिंप्री गवळी येथील श्री. प्रमोद दत्तात्रय पाटील (खर्चे) व सौ. राधा पाटील यांची मुलगी डॉ. प्रियंका खर्चे धांडे या जिद्दी मुलीने दाखवून दिले आहे. प्रियंका हिने प्रवरा गर्ल्स इंग्लिश मेडीयम स्कूल, लोणी जि. अहमदनगर येथे १० वी पर्यंतचे शालेय शिक्षण पूर्ण केले, शाळेमध्ये असतानाही सर्व स्पर्धांमध्ये तिचा सहभाग असायचा. मग ते स्पोर्ट्स असतील किंवा मग सायन्स ऑलिम्पियाड सारख्या परीक्षा. श्री. शिवाजी कॉलेज नांदेड येथे ११ वी व १२ वी चे शिक्षण पूर्ण केले. १२ वी चा निकाल लागल्यानंतर मेडिकल फील्डमध्ये न जाता तिने ॲग्रिकल्चरमध्ये पुढे अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे B. Sc. Agri. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाली. बी. एस्सी. करत असताना इंडियन कॉउंसिल ऑफ ॲग्रिकल्चर रिसर्च, नवी दिल्ली (ICR) JRF परीक्षेची तयारी ॲग्रिकल्चर इकॉनॉमिक्स या विषयात करत होती आणि त्याचे यशही तिला मिळाले इंडियन कॉउंसिल ऑफ ॲग्रिकल्चर रिसर्च, नवी दिल्ली JRF–२०१६ मध्ये AIR–८९ रँक तिने पटकावला. सोबत महाराष्ट्र कॉउंसिल ऑफ ॲग्रिकल्चर एजुकेशन अँड रिसर्च, पुणेच्या PG CET मध्ये सुद्धा चांगला रँक मिळवून यश मिळविले. २०१६–२०१८ मध्ये ॲग्रोनॉमि (कृषि विद्या) या विषयात कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर, पुणे येथे एम. एस्सी. पूर्ण केली. ऑरगॅनिक बेबी कॉर्न कल्टिव्हेशनवर एम. एस्सी. चा शोध प्रबंध लिहिला. एम. एस्सी. च्या शोध प्रबंधाला PLANTICA फाऊंडेशन, देहरादूनचा बेस्ट थिसीस अँड इनोवेटिव रिसर्च अवॉर्ड – २०२० मिळाला. २०१८ मध्ये पीएचडी एंट्रन्स देऊन १० वा क्रमांक मिळवत पी. एचडी. ला महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे ॲग्रोनॉमि विभागात ॲडमिशन घेतली. सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट फॉर क्लायमेट स्मार्ट इंटिग्रेटेड फार्मिंग सिस्टिम या विषयावर २०१९–२०२० या कालावधीमध्ये काम केले. २०१९ मध्ये सारथी, पुणे येथील संस्थेचा छत्रपती शाहू महाराज नॅशनल रिसर्च फेल्लोशीप–२०१९ अवॉर्ड झाली. ३१ हजार प्रति महिना फेल्लोशीप आणि रिसर्च करण्यासाठी पर्याप्त ट्रेनिंग तिला या संस्थेकडून मिळाले. जुन २०२२ मध्ये पी. एचडी. चा शोध प्रबंध सादर केला. तिच्या या कामाची डॉ. सि. जयंती फॉर्मर डायरेक्टर क्रॉप मॅनेजमेंट, तामिळनाडु ॲग्रीकल्चर युनिव्हर्सिटी, कोईम्बतूर यांनी प्रशंसा केली. लग्न झाल्यानंतरचे नाव डॉ. प्रियंका चेतन धांडे आहे. मूळगाव सांगवी ता. यावल ह. मु. सातपूर, नाशिक. श्री. चेतन जीवन धांडे यांचा सातपूर येथे स्वतःचा गुंजन पेप्सी या नावाने व्यवसाय आहे. सध्या असिस्टंट प्रोफेसर ऑफ ॲग्रोनॉमि म्हणून डॉ. प्रियंका के. के. वाघ कृषि महाविद्यालय येथे कार्यरत आहे. पण मला इथेच थांबायचे नाही शेतकऱ्यांसाठी व समाजासाठी माझ्या ज्ञानाचा उपयोग करायचा आहे'' असं ती म्हणते.

**डॉ. प्रियंका खर्चे,**
सातपूर, नाशिक

# सुखी संसारासाठी

**प्रा. डॉ. सुहास महाजन**



घराला घरपण देणाऱ्या माणुसकीच्या माणसांनी प्रेम आणि जिव्हाळा ओतून साकारलेल्या आपुलकीच्या भिंतीमधील एकमेकांवर जीवापाड प्रेम करणाऱ्यांचं 'घर' हे आयुष्यभर मायेची सावली देणारं झाड असतं. त्यामध्ये प्रेम, जिव्हाळ्याची – जिवाभावाची नाती जुळून निर्माण झालेलं एकत्र कुटुंब हा तर जणू आधार वड असतो. या प्रत्येक घरट्यातून नित्यनियमाने चालणाऱ्या घरगुती शिक्षणाच्या संस्कार शाळेमध्ये हव्या हव्याशा वाटणाऱ्या प्रेमळ आजी–आजोबांकडून केले जाणारे मूल्यसंस्काराचे नित्यपाठ आणि जिवनाभिमुख शिक्षणाचे गृहपाठ गिरवितांना तयार झालेली संस्कारक्षम तरुण पिढी त्या मूल्याधिष्ठित समाजाचा आदर्श असतो. दुर्दैवाने आजच्या व्यावहारिक जगतामध्ये या जुळलेल्या नातेसंबंधांनाही तडे जातांना दिसत आहेत. आदर्श समाजामधील एकसंघ अशा एकत्र कुटुंबाला बांधून ठेवणारी परस्पर प्रेम आणि जिव्हाळा यांची घट्ट वीण उसवत चालली आहे कां असा प्रश्न सारखा मनात येतो.

एकत्र कुटुंबपद्धतीला नजर लागून विभक्त कुटुंबांची संख्या दिवसेंदिवस वेगाने वाढत आहे. घरोघरी चालणाऱ्या या संस्कार पाठशाळांना बदललेल्या परिस्थितीमध्ये कुलुप लावण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळेच मूल्य संस्कारासाठी विभक्त कुटुंबामधील कार्यमग्न पालकांची बाजारु शाळांवर जास्त भिस्त आहे. या हाय–फाय शाळांमधून मूल्यशिक्षणाचे पाठ भरभरून दिलेही जात असतील; पण त्यामधून खऱ्या अर्थाने 'शिकणे' कितपत घडते हे अनुत्तरितच रहाते. बदलत्या परिस्थितीनुसार विभक्त होणे हे अपरिहार्य भासत असले तरी सुद्धा त्याचे दुष्परिणामच अधिक असतात हे जाणवण्याची सुबुद्धी विभक्त झाल्यानंतरच होते. पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. तडजोडीच्या भावनेनी अहंकार बाजूला ठेऊन मोठ्या मनाने समजूतदारपणा दाखविल्यास गेलेली वेळही परत येऊ शकते. आपल्या प्रेमाच्या माणसाला त्याच्या प्रेमाच्या माणसासकट स्विकारल्यास माणसागणिक मिळणारे प्रेमही वाढत जाते.

'भरल्या घरामध्ये वावरणारी नातवंड म्हणजे दुधावरची साय' असे मानणाऱ्या आजी–आजोबांची अवस्था या विभक्त कुटुंबामध्ये अतिशय विचित्र झाली आहे. तरुण पिढी आणि वयोवृद्धांची पिढी यांच्यामधील दरी दिवसेंदिवस अधिकाधिक रुंदावत आहे. आजकालच्या 'हम दो – हमारे दो' या परिस्थितीमध्ये त्यांच्याकडे अडगळ म्हणून पाहिले जाते आणि त्यांची रवानगी वृद्धाश्रमात केली जात आहे. ज्या आई–वडिलांनी जन्म दिला त्यांनाही मुलं विसरतात हे मनाला वेदना देणारे आहे. मुला–बाळांच्या स्नेहाला पारखे झालेल्या आजी–आजोबांसाठी स्नेह मंदिराची उभारणी करून या वेदना कमी होऊ शकत नाही, दिवसेंदिवस माणुसकीचा ऱ्हास होत असल्यामुळे वृद्धाश्रमांसाठी प्रतिक्षायादी वाढत आहे आणि या साऱ्या कौटुंबिक दुरावस्थेमुळे खऱ्या अर्थाने भरडली जातात ती लहान मुलं. मायेची फुंकर आणि प्रेमाचा ओलावा न मिळाल्यामुळे दुभंगलेल्या नात्यांशी जबरदस्तीने जुळवून घेतांना त्यांची होणारी घालमेल आणि मानसिक कोंडमारा यांचे त्यांच्या बालमनावर होणारे विपरीत परिणाम यामुळे ते आपलं बालपणच जणू हरवून बसतात. काहीही न समजण्याच्या या बालवयात दुर्दैवाने अविचारी पालकांकडून त्यांना टीव्ही, स्मार्ट फोन, आयपॅड इत्यादींची भुरळ पाडली जाते आणि त्यांच्या भावी आयुष्याचं सगळं गणितच चुकतं. एकाकीपणा घालवण्यासाठी बिचारी अजाण मुलं दिवस–रात्र मोबाईलला चिकटून बसतात, मोबाईलच्या विश्वामध्ये त्यांच्या परिस्थितीमुळे भरकटलेल्या भावी आयुष्याची विस्कळीत झालेली पान उलगडत बसतात, ही या शतकामधील शोकांतिका आहे. स्मार्टफोनची मोहिनी अतिशय घातक आहे. त्यासाठी पालक आणि मुलांमध्ये आनंददायी वैचारिक देवाण घेवाण वाढविण्याचे सहज आणि सुलभ मार्ग शोधण्याची गरज आहे.

'घरोघरी मुली शिकल्या–सवरल्या की त्यामुळे संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होतं. त्यामुळे उत्तरोत्तर समस्त समाजाची प्रगती होते.' यासारख्या सूचक संदेशांनी गावोगावी भिंती रंगविण्याचे नाविन्यपूर्ण उपक्रम नववर्षानिमित्ताने इमखास राबविले जातात. 'परक्याचे धन' मानल्या गेलेला मुलीच्या शिक्षणाचा ज्वलंत प्रश्न या निमित्ताने

चर्चेमध्ये येऊन त्यांना प्रोत्साहनही मिळालं, शिक्षणाचा यथायोग्य प्रचार आणि प्रसारही झाला. घराघरातील मुली सज्ञान झाल्या आणि खास महिलांसाठी आयोजिलेल्या नवनवीन शैक्षणिक उपक्रमांना चालना देखील मिळाली. आजची स्त्री ही शिक्षणाच्या जोरावर बाहेरच्या जगामध्ये अभिमानाने वावरत आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक कार्यामध्ये सहभागी होत आहे. आज या शिक्षित मुली आपल्या कर्तबगारीने विविध क्षेत्रामध्ये अत्युच्च अशा शिखरावर विराजमान झालेल्या दिसतात. शिक्षणामुळे त्या आज प्रत्येक क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत ही अभिमानाची गोष्ट आहे. प्रतिभावंत तसेच प्रगल्भ विचारसरणीमुळे या सक्षम मुली आर्थिक स्वातंत्र्याबरोबर त्यांच्या उच्चशिक्षित भावी जोडीदारासोबत कौटुंबिक जवाबदारी समर्थपणे उचलण्यासाठी तयार आहेत. परंतु हेच उच्च शिक्षण, नोकरी व्यवसायामधील वरिष्ठ स्थान आणि आधुनिक विचार प्रवाह त्यांच्यासाठी विवाह ठरविताना अडचणीचे ठरत आहेत. नोकरदार मुलींसाठी सुयोग्य जोडीदार निवडणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. ही निवड करतांना अनेक स्वरूपाच्या नवनवीन प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. बऱ्याच प्रसंगी प्राप्त परिस्थितीमधून मार्ग काढण्यासाठी या उच्च शिक्षित मुलींना तीव्र स्वरूपाची नाराजी पत्करून तडतोड करण्याशिवाय पर्याय उरत नाही. करिअर प्रधान मुलींचे वाढते वय, विवाह ठरविताना त्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी, विवाहानंतर उच्च पदस्थ नोकरी कायम ठेवण्यासाठी वरपक्षाकडून मांडली जात असलेली आग्रही भूमिका या साऱ्या गोष्टींचा योग्य समतोल साधून खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडी यामधून उद्‌भवणाऱ्या कौटुंबिक समस्या दिवसेंदिवस कर्तबगार सून, जाचक होत आहे. बऱ्याच वेळा विवाहेच्छु मुलींनी कर्तबगार सून, कमावती बायको आणि आदर्श माता म्हणून सिद्ध करावे अशी आग्रही भूमिका उच्चशिक्षित मुलांच्या वडिलधाऱ्या मंडळीकडून मांडली जात आहे. असे प्रतिसाद देखील याठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे.

पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण करणाऱ्या आधुनिक जीवनशैलीने प्रभावीत झालेल्या या काळामध्ये मानसिक आनंद, आर्थिक स्वातंत्र्य आणि निरोगी आरोग्य या त्रिसूत्रीचा समतोल साधतांना निर्माण झालेल्या कुटुंबाचा बिघडलेला तोल सावरण्यासाठी प्रत्येकाला कसरत करावी लागत आहे. प्रत्यक्षात सुखी आणि समाधानी कुटुंब हीच आपली खरी संपत्ती आहे, मूल्यवान ताकद आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये ही कुटुंबसंपदा आपण खऱ्या अर्थाने जपायला हवी. कारण 'कुटुंब' या संकल्पनेच्या भरभक्कम आधारावरच आपण प्रगतीपथावरील प्रेरणादायी पायऱ्या यशस्वीपणे चढत असतो. स्पर्धायुक्त नोकरी-व्यवसाय क्षेत्रामध्ये अपेक्षित यश संपादन करण्यासाठी प्रत्येकजण वाट दिसेल तसा धावतोय. पण त्या बेफाम धावण्याची त्याची अर्थहीन दिशा केव्हाच भरकटलेली आहे. शून्यामध्ये हरवलेली आहे. यशस्वी तर अनेकजण होतात पण समाधानी फार थोडेचजण असतात. यश हे जरी आपल्या कर्तृत्वाचा विजय असला तरी समाधान हा आपल्या मनाचा विजय असतो. देश-विदेशातील परिचित आणि अपरिचितांशी अहोरात्र व्यावसायिक संवाद साधतांना आपल्या कुटुंबातल्या जवळच्या माणसांशी प्रेमाचा सुखसंवाद तुटत चालला आहे. आनंद मिळविण्यासाठी जबरदस्तीने काम कराल, तर आनंद मिळणार नाही; पण आनंदी होऊन मिळेल. ते काम मनापासून कराल तर आनंद नक्कीच मिळेल. परदेशी संस्कृतीचा वाढता प्रभाव, करिअरच्या मागे धावण्याची अतिरीक्त कामामुळे वाढलेला मानसिक ताण-तणाव आणि त्यामधून उद्‌भवणाऱ्या शारिरीक समस्या इत्यादींचा कुटुंबसंस्थेवर विपरीत परिणाम होत आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीमध्ये वैवाहिक जीवनातील वाढते ताण-तणाव आणि विसंवाद यामुळे निर्माण होणारे अनुत्तरित प्रश्न आज गुंतागुंतीच्या समस्या निर्माण करीत आहे.

या कठीण काळामध्ये जिवंतपणी नुसती नाती जपण्यापेक्षा नात्यामधील जीवंतपणा जपण्यासाठी थोडा जरी प्रयत्न केला तरी ती नाती टिकविता येतील, फुलविता येतील, आयुष्यभर गोडीगुलाबीने जपताही येतील आणि त्यामुळेच नवोदितांचे संसार सुखाचे होतील. त्यामधूनच त्यांना आयुष्यभर सुख समृद्धी प्राप्त होईल. नात्यांचं परिस्थितीप्रमाणे बदलत चाललेलं गणित हे बँकेतल्या खात्यासारखं झालयं. ज्या खात्यातून जास्त फायदा मिळतो तीच खाती चालू ठेवतात म्हणून नाती बनवतांना अशी बनवा की व्यक्ती शेवटच्या श्वासापर्यंत तुमच्या सहवासात राहिल कारण व्यवहारी जगामध्ये प्रेमाची कमतरता नाही, कमतरता आहे ती फक्त नाती निभावण्यासाठी धडपडणाऱ्या खऱ्या व्यक्तीची. नाती निभावणे प्रत्येकालाच जमत नाही. कारण नाती जपतांना दुसऱ्याच्या आनंदासाठी कित्येक वेळा स्वतःच मन देखील दुखवावं लागत. खरी नाती तीच असतात जी रुसतात, रागवतात, कडवट होतात;

पण साथ कधीच सोडत नाहीत. आयुष्यात एक वेळ संपत्ती कमी मिळाली तरी चालेल; पण प्रेमाची अशी माणसं मिळवा, की कोणाला त्यांची किंमत करता येणार नाही. मनासारखी माणसं शोधण्यापेक्षा मन समजून घेणारी माणसं शोधा, फार काही कमावून गमावण्यापेक्षा मोजके कमावून जतन करा. मग ती पैसा असो किंवा माणसं---!

लग्नाची परिसीमा ओलांडल्यानंतर अपेक्षाभंगातून स्वप्नभंग होण्यापेक्षा लग्नाचे हे सप्तरंग मेहंदीच्या सहाय्याने रेखाटण्यापूर्वीच त्यामधील खोल असे अंतरंग जाणून घेतल्यास लग्न आणि त्यामधून साकारलेले सहजीवन यातून केवळ सुखप्राप्तीचं होते. यासाठी विवाहयोग्य तरुण-तरुणींची मानसिकता काळाप्रमाणे बदलण्याची गरज आहे. लग्नानंतर स्वतंत्रपणे विचार करण्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्याची आवश्यकता आहे. बदलल्या परिस्थितीमध्ये नवनवीन बदलांना सामोरे जाण्यासाठी त्यांना तयार करतांना समजूतदार पालकांनादेखील आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे.

समस्त समाजबांधवांच्या मदतीसाठी कौटुंबिक समस्या, तंटे, वादविवाद सोडविण्यासाठी भ्रातृमंडळ, पुणे संचलित कौटुंबिक सल्ला व मार्गदर्शन केंद्र कार्यरत आहे यातर्फे कौटुंबिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी समुपदेशन करण्यात येते. 'समुपदेशन' म्हणजे अतिशय अवघड आणि क्लिष्ट अशी मानसिक तणाव निर्माण करणारी वेगळी वाट नसून तरुण मुला-मुलींना 'आत्मकेंद्री' होण्यापेक्षा 'सर्वस्पर्शी' होण्यासाठी अनुभवी आणि तज्ज्ञ मार्गदर्शकांनी दाखविलेली एक सुकर अशी पाऊलवाट आहे. चला तर, भविष्यामध्ये आपल्या कौटुंबिक समस्या जाचक होण्याआधीच वर्तमानात त्यांचे निराकरण करण्यासाठी उपलब्ध असलेल्या अनेक पर्यायांची, भूतकाळातील घटनांच्या आधारे - समस्त माहिती करून घेऊया. समुपदेशक प्रत्येक वेळी आपल्या बरोबर असतातच. शेवटी अंतिम निर्णय मात्र आपल्यालाच घ्यावा लागतो. न्यायालयाचा दरवाजा ठोठावणे, अंतीम निर्णयासाठी कित्येक वर्ष मानसिक तणावाखाली ताटकळत राहणे आणि पैशासोबत वेळेचादेखील अपव्यय करणे यापेक्षा कुटुंब टिकविण्यासाठी उभयतांनी केलेली तडजोड ही बऱ्याचवेळा फलदायी ठरते. म्हणूनच समुपदेशनाच्या माध्यमातून वाटचाल करूया. दिशा दर्शक वाटेनी नातेसंबंधामधील रेशीमगाठी घट्ट बांधण्यासाठी, नशीबाने मिळालेले हे जीवन सुफल आणि सुंदर करण्यासाठी - हृदयाची अतूट नाती सदैव जपण्यासाठी!

समुपदेशन केंद्रामधील तज्ज्ञ समुपदेशक आपल्या उभयतांशी मोकळेपणाने सुसंवाद साधण्यासाठी उत्सुक आहेत; परंतु त्यासाठी आवश्यक आहे आपला आमच्याशी दूरध्वनीद्वारे प्रत्यक्ष संपर्क ! म्हणून गरज भासल्यास मुक्त संवाद साधण्यासाठी अवश्य संपर्क करा. आपल्या उर्वरीत आयुष्यामधील सुखी संसारासाठी आणि संसारातील प्रत्येक सुखासाठी आमच्या मनःपूर्वक शुभेच्छा !

सुखानंदाचे ते दिस घेऊन आले नववर्ष तेवीस

तुम्हा आज शुभेच्छा नवयुगाच्या प्रारंभीस---!

# बोली भाषा

**सरला भिरूड**



बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून तत्कालीन घटना, आणि भूगोलाचे दर्शन घडते. तसेच मानवी भावना व्यक्त केल्याने ते सर्वांना समावेशक वाटते. दारी आलेला बैरागी, गोसावी, वारकरी यांचे गायन त्या ऐकतात. त्यामुळे आजही त्यांच्या काव्यात ताजेपणा जाणवतो आणि तो तसाच राहीलही. आज जी बोली पूर्व खानदेशात बोलली जाते तिला लेवा गण बोली म्हटली जाते. खरं तर या प्रदेशातील सर्वच लोक म्हणजे अठरापगड जातींचे लोक ती भाषा बोलतात म्हणून तिला लेवा गण बोली म्हणणे चुकीचे आहे, असे माझे मत आहे.

भाषा ही प्रवाही असते आणि लोकांच्या संवादाचे माध्यम असते. 'कोस कोस पर बदले पानी, और चार कोस पर वाणी' अशी एक म्हण आहे. बोली भाषेत सहजता, स्वाभाविकता, मौखिक परंपरा, गाणी, उखाणे, म्हणी हे सगळे अलंकार आहेत. बोली भाषेचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यातील उत्स्फूर्तता व जिवंतपणा होय. जसे की आईसाठी ईसाव्याचं झाड, आकाशीची घार वगैरे वगैरे... त्या त्या मातीचे गुण, स्वाद, पिकणारी पिके, फळं, भाजीपाला हे सगळे त्या बोलीत येते. त्याविषयी क्रियांचे वर्णन येते. उदाहरणार्थ कोकणी लोकांच्या भाषेत म्हावरा अन् दर्या येणारच. तसेच या बोलीत भरीत, शेवभाजी, दालबाटी येणारच. जोडीला

तोंडीलावणे म्हणून पापडबिबडे येणारच. अगदी भूगोलाशी आणि पर्यायाने मातीशी घट्ट नातं हे बोली भाषेचे असते. इस्तवाचा इंगुळ हा नवऱ्यासाठी शब्द अगदी चपखल बसतो. असे शब्द हीच बोली भाषांची देणं आहे. या बोलीभाषाच प्रमाण भाषा समृद्ध करतात.

त्यात सतत नवीन शब्दांची इतर भाषांतील शब्द येत असतात. कारण जसजसे तंत्रज्ञान बदलत जाते, लोक जीवनाचा भाग होतं जाते, तसतशी भाषा बदलते.याचे उत्तम उदाहरण म्हणजे बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून तिफन सारखे शब्द येतात आणि शेतीशी संबंधित शब्द येत राहतात. आताच्या लिखाणात आजचे शब्द आणि व्यक्ती यायला हवे.

१८८० च्या खानदेश गॅझेट मध्ये, १८७२ मध्ये केलेल्या भाषिक सर्वेक्षणानुसार खानदेशात बोलली जाणारी बोली भाषा, जिला खानदेशी किंवा अहिराणी भाषा म्हटले आहे, त्या भागात अहिर राजांचे राज्य होते, विशेषतः तिसऱ्या शतकाच्या उत्तरार्धात, नाशिक येथील लेणीतील शिलालेखातून हा संदर्भ मिळतो. गुजराती भाषिक शब्दांचा जास्त प्रमाणात वापरही तापीच्या पश्चिम किनाऱ्यावर बोलली जाणाऱ्या भाषेची उपभाषा म्हणायला हरकत नाही. त्यात मराठी आणि हिंदी यांचे मिश्रण असते म्हणून तिला धेडगुजरी असे म्हटले आहे.( आर. जी. भांडारकर) खानदेशात जिला खानदेशी बोली म्हटली जाते, ती गुजराथी, मराठी, हिंदुस्थानी आणि नेमाडी यांचे मिश्रणातून तयार झाली आहे. या प्रदेशात फारूकी राजघराणे जवळपास तीनशे वर्षे राज्य केले. त्यामुळे बरेचसे फारसी तसेच त्या काळात तयार झालेल्या दख्खनी भाषेतील शब्द येतात. त्यानंतरच्या काळात मुगल शासन होते, त्यांच्या दरबारात फारसी ही व्यवहाराची भाषा होती आणि त्या कवींना मानसन्मान होता. बुऱ्हानपुर ही त्यांची राजधानी, या राजधानीत बरेचदा संस्कृत आणि फारसी तज्ज्ञांच्या चर्चा चालत त्यामुळे ज्ञानाची देवाणघेवाण झाली. मराठी संत साहित्यात याचे प्रतिबिंब दिसते. खानदेशी बोलीतील, चमन, लफंगा, इब्लिस असे बरेच शब्द आलेले दिसतात. सतरंजी हा शब्द शतरंज खेळतांना अंथरायचे वस्र यातून तयार झाला आहे. अशी बरीच उदाहरणे देता येतील. दराबा हा पदार्थ सुध्दा होय.

कायकू, मेरेकू, तेरेकू अशी प्रत्यय लागलेली दख्खनी भाषा मुगलपूर्व काळात तयार झाली. ही बोली काही आधुनिक गुजराथी, मराठी आणि हिंदी तसेच काही प्राचीन प्राकृत भाषेतील मागधी, सौरसेनी, लाटी-(प्राचीन गुजराथी, गुजरातचे प्राचीन नाव लाटदेश असे होते) यांच्या भाषेतील समन्वयाने तयार झाली.


महाराष्ट्री, पैशाची आणि अपभ्रंश भाषा या भाषा प्राचीन प्राकृत भाषा होय. त्यातील बरेच शब्द आलेले आहे.

काही बल्लाळ आणि सापांच्या गीताव्यतिरिक्त ही संपूर्णपणे बोली भाषाच आहे. ल हा शब्द काढून य शब्द येतो. ले हा प्रत्यय लागून तसेच नी हा पण लावला जातो. सातपुड्याच्या कुशीतील भिल्ल मात्र गुजराथी, पश्चिम भागातील तर पूर्वेकडील भागात निमाडी बोलली जाते. सगळ्यांना जवळपास हिंदी येते, मराठी सुध्दा येते. बोहरा लोक गुजराथी बोलतात तर मुसलमान हिंदुस्थानी बोलतात, खरं तर तिला हिंदुस्थानी ऐवजी दख्खनी म्हणायला हरकत नाही. खानदेश गॅझेट १८८० मध्ये यांचा सखोल तपशील दिला आहे. कोणती लोक कोणती बोली बोलतात त्याबाबत होय. तरीही या विविध प्रांतिक, धर्माच्या लोकांची एक सामायिक बोली तयार झाली, जिला बाजारातील, व्यापारातील बोली म्हणता येईल.जशी दहाव्या अकराव्या शतकात उर्दू भाषा तयार झाली. अरबी,फारसी, इंग्रजी, हिंदुस्थानी आणि कर्नाटकी, मराठी भाषिक लोक सैन्यात एकत्र यायचे आणि त्यांच्या समन्वयातून, संवादातून ही भाषा तयार झाली. जी नंतरच्या दख्खनी बादशहांनी राजभाषा म्हणून वापरली, आणि त्यात उत्कृष्ट काव्यरचना झाली. इतर सर्व भाषांतील साहित्य त्यात आहे. भाषा प्रवाही असते याचे उत्तर उदाहरण म्हणून उर्दू भाषा होय.

आपली भाषा टिकली पाहिजे याबद्दल दुमत नाहीं पण भाषा फक्त संवादाचं साधनच नव्हे तर संस्कृतीचे वाहन पण असते. आपल्या वापरात येणारा प्रत्येक शब्द एका प्रक्रियेतून गेलेला असतो, हजारों वर्षांची ही प्रक्रिया असते. त्यात भूगोल, जगण्याची व्यवधान पण येतात. आदानप्रदानहीअसते. इतर संस्कृती बरोबरचा झालेला संवाद सुध्दा असतो. ती कृत्रिम होणार नाहीं तर त्यात संवाद व ज्ञान ही असेल हे बघायला हवे. आपल्या म्हणीत अशी कण गुंफलेले आहेत. त्याचा वापर हवा. भाषेला तुम्ही जातीजमातीत बंद करू शकत नाही. तसे असते तर आचार्य अत्रे यांना बहिणाबाई चौधरी यांच्या कविता भावल्याच नसत्या. खरा जीवनानुभव आणि तळमळ व्यक्त करणारे साहित्य अस्सल आहे.

व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, स्थानिक शहाणपण, जे सामाजिक ज्ञान म्हणता येईल आणि हे सगळे गुण भाषेतील खडूसपणा काढून लवचिकता आणि सहजता प्रदान करतात. सुगंध, ठसका, लयबध्दता हे बोली भाषेचे वैशिष्ट्ये आहे. म्हणून या बोलीतील ज्ञान आणि अनुभव जगासमोर आला तरच ही भाषा आणि पर्यायाने संस्कृती फळेल.

# *कै.डॉ.प्रभाकर पुरुषोत्तम चौधरी यांना आदरपूर्वक*
# *आदरांजली.*



लेवा पाटीदार समाज मंडळ, ठाणे-डोंबिवलीचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रभाकर पुरुषोत्तम चौधरी यांचे पुणे येथे २ डिसेंबर २०२२ रोजी अल्पशा आजाराने ९० व्या वर्षी निधन झाले.

